# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक २१८ वा गुरूवार दि.०१ फेब्रुवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## भुजबळांचा मंत्रिपदाचा राजीनामा नोव्हेंबरमध्येच मुख्यमंत्र्यांकडे?



नाशिक : राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री आणि ओबीसी समाजाच्या प्रश्नांसाठी आक्रमक भूमिका घेणारे नेते छगन भुजबळ यांनी नोव्हेंबर २०२३ मध्येच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मंत्रिपदाचा राजीनामा दिल्याची माहिती समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या वरिष्ठ नेत्यांनी याला दुजोरा दिला आहे. मात्र, मुख्यमंत्र्यांनी अद्याप तो स्वीकारला नसल्याची माहिती आहे. छगन भुजबळ यांनी राजीनाम्याच्या मुद्यावर बोलण्यास नकार दिला. मात्र, ओबीसी समाजाच्या आरक्षणाच्या मुद्यावर कसल्याही प्रकारची तडजोड करणार नाही, त्यासाठी कोणत्याही थराला जायची तयारी असल्याचे भुजबळ म्हणाले. मराठा समाजाला आरक्षण देण्यास विरोध नाही मात्र त्यासाठी ओबीसी समाजाला किंमत मोजावी लागू नये, असे भुजबळ म्हणाले. ओबीसींच्या हिताचे संरक्षण करणे ही प्राथमिकता असल्याचे छगन भुजबळ यांनी मीडियाशी बोलताना म्हटले.राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या वरिष्ठ नेत्यांनी छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे १६ नोव्हेंबर २०२३ ला राजीनामापत्र दिल्याचे म्हटले आहे. जालन्यातील अंबडच्या सभेच्या एक दिवस अगोदर भुजबळांनी ते पत्र मुख्यमंत्र्यांकडे दिले होते. मुख्यमंत्र्यांनी राजीनामा स्वीकारल्यास भुजबळांचे मंत्रिपद जाऊ शकते.

# तर मंडल आयोगाला आव्हान देणार : मनोज जरांगे

मावळ : मराठ्यांना सरसकट आरक्षण मिळवून देण्यासाठी लढा उभारणारे मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईच्या वेशीपर्यंत लाखो मराठ्यांना आणल्यानंतर सरकारने माघार घेतली. राज्य सरकारने सगेसोय-यांना कुणबी प्रमाणपत्र मिळवण्यातील अडचणी दूर करणारा अध्यादेश काढला. तथापि, मंडल आयोगालाच आव्हान देण्याचा पवित्रा मनोज जरांगे यांनी घेतला आहे.मराठा आरक्षण विषयक अध्यादेशावर ओबीसी नेते छगन भुजबळ आणि प्रकाश शेंडगे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. या अध्यादेशावर हरकती उपस्थित करीत त्याला आव्हान देणार असल्याचे भुजबळ यांनी म्हटले आहे. यावर आता मनोज जरांगे पाटील यांनी अध्यादेशाबद्दल काही दगाफटका झाला तर मंडल आयोगालाच चॅलेंज कणार असून आपण वकीलांची लवकरच बैठक घेणार असल्याचे म्हटल्याने आता ओबीसी विरुद्ध मराठा राजकारण तापले आहे.मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावर टीका केली आहे. त्यांचा पुन्हा ऐकरी उल्लेख करीत त्याला माणस मोजायला पुलावर उभे रहायला मी सांगितले होते, पण तो थांबला नाही. त्यामुळे त्याला कोटी मराठे कसे दिसतील? मराठ्यांची ६४ किलोमीटर रांग होती आणि एकूण २७ टप्पे होते असेही मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाबद्दल केलेल्या वक्तव्यावरुन काहीही काळजी न करण्याचे आवाहन जरांगे पाटील यांनी मराठ्यांना केले आहे. शंभर टक्के मंडल आयोगाला चॅलेंज मंडल आयोग कोर्टाने स्वीकारलेला नाही. त्यामुळे छगन भुजबळने



जर पुन्हा काड्या केल्या तर मी शंभर टक्के मंडल आयोग चॅलेंज करेन. राज्य सरकारने आमची कुठेही फसवणूक केलेली नाही. दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मुख्यमंत्री आमच्या पाठीमागे उभे राहतील, असेही मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.मंडल आयोगाला आव्हान द्याच : भुजबळ मनोज जरांगे पाटील यांच्यात हिंमत असेल तर त्यांनी मंडल आयोगाला आव्हान देऊन दाखवावे, असे विधान छगन भुजबळ यांनी केले आहे. जरांगे पाटील यांच्याएवढा ज्ञानी देशात दुसरा नाही. मराठा समाजाला मागच्या दाराने आरक्षण प्रवेश दिला जात असल्याबाबत छगन भुजबळ यांनी आक्षेप व्यक्त केला.

## मुरुड येथे नमो चषक स्पर्धेचा आ.कराड यांच्या हस्ते शुभारंभ होणार



लातूर : - भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने नमो चषक २०२४ च्या माध्यमातून आयोजित लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध क्रीडा स्पर्धेचा शुभारंभ भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते १ फेब्रुवारी २०२४ गुरुवार रोजी सायं ५ वाजता मुरुड येथे होणार आहे तेव्हा मतदार संघातील भाजपा लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह, खेळाडू आणि क्रीडा प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

नमो चषक २०२४ सर्वत्र मोठ्या प्रमाणात होत असून या क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धेच्या माध्यमातून तरुणात उत्साहाचे आणि नवचैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील रेणापूर आणि लातूर दोन तालुक्यात विविध क्रीडा स्पर्धांचे मोठ्या प्रमाणात नियोजन करण्यात आले आहे. फायनल स्पर्धा विधानसभा मतदारसंघाची होणार आहे. त्यानुसार लातूर तालुक्यातील मुरुड येथे क्रिकेट हॉलीबॉल, खो-खो, कबड्डी स्पर्धा होणार आहेत तर रेणापूर तालुक्यातील रेणापूर येथे क्रिकेट आणि कुस्तीस्पर्धा, खो-खो आणि हॉलीबॉल खरोळा तर कॅरमची स्पर्धा पोहरेगाव येथे आयोजित करण्यात आली आहे.

या सर्व स्पर्धांचा शुभारंभ १ फेब्रुवारी २०२४ गुरुवार रोजी सायंकाळी ५ वाजता मुरुड येथील सार्वजनिक स्टेज छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते होणार आहे. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, भाजयुमोचे प्रदेश सचिव ऋषिकेशदादा कराड, जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

नमो चषक २०२४ स्पर्धेच्या शुभारंभ कार्यक्रमास लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टीच्या विविध आघाडी मोर्चासह सर्व पदाधिकारी लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी त्याचबरोबर खेळाडू आणि क्रीडा प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

## बिहारमध्ये न्याय यात्रेत चेंगराचेंगरी; राहुल गांधी थोडक्यात बचावले

कटिहार : काँग्रेस नेते राहुल गांधी यांची 'भारत जोडो न्याय यात्रा' सध्या बिहारमध्ये आहे. त्यांनी बुधवारी कटिहार येथे पदयात्रा केली. या प्रवासादरम्यान चेंगराचेंगरी झाली. यावेळी राहुल गांधी यांच्या गाडीचे नुकसान झाले. ते थोडक्यात बचावले.राहुल गांधी कारमधून उतरून बसमध्ये बसले. राहुलच्या भारत जोडो यात्रेचा आज १८ वा दिवस आहे. राहुल गांधी यांचा हा प्रवास आज बिहारमधून बंगालमध्ये दाखल होणार आहे. राहुल गांधी या प्रवासात मिरचाईबारी डीएस कॉलेजमार्गे लाभा येथील जाहीर सभेनंतर ते बंगालला रवाना होतील.न्याय मिळत नाही तोपर्यंत हा प्रवास बिहारच्या दौ-यात राहुल गांधी म्हणाले की, बिहारच्या मातीवर अन्यायाविरोधात सुरू असलेल्या न्यायाच्या महायात्रेला जनतेचे भरभरून प्रेम आणि पाठिंबा मिळत आहे. न्याय हक्क मिळेपर्यंत हा प्रवास सुरूच राहणार आहे. आज 'भारत जोडो न्याय यात्रा' बिहारमधून पश्चिम बंगालमध्ये दाखल होत आहे. यावेळी बिहार काँग्रेसचे अध्यक्ष अखिलेश प्रसाद सिंह यांनी पश्चिम बंगाल काँग्रेसचे अध्यक्ष अधीर रंजन चौधरी यांना राष्ट्रध्वज सुपूर्द केला. ही यात्रा दुस-यांदा बंगालमध्ये दाखल होत आहे.रस्त्याच्या दुतर्फा लोकांची गर्दी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बुधवारी बिहारमधील कटिहार जिल्ह्यात रोड शो करून 'भारत जोडो न्याय यात्रा' पुन्हा सुरू केली. कटिहार येथे रात्री थांबल्यानंतर, राहूल गांधींनी सकाळी आपली यात्रा सुरू केली आणि सकाळी ११:३० च्या सुमारास मालदामार्गे पश्चिम बंगालमध्ये प्रवेश करणे अपेक्षित आहे, असे पक्षाच्या एका नेत्याने सांगितले. रस्त्याच्या दुतर्फा रांगा लावून स्थानिकांनी राहूल गांधींना अभिवादन केले.बिहार काँग्रेसचे अध्यक्ष अखिलेश प्रसाद सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, राहूल गांधी काही दिवसांनी झारखंडमार्गे राज्यात परततील. १४ जानेवारीला मणिपूरमध्ये सुरू झालेली 'भारत जोडो न्याय यात्रा' ६७ दिवसांत ६,७१३ किमी अंतर कापून १५ राज्यांतील ११० जिल्ह्यांतून २० मार्च रोजी मुंबईत संपेल.



## लातूर महावितरणचा मुख्यमंत्री कृषी सौरउर्जा योजनेत ऑनलाईन घोटाळा
## शेतकर्यांच्या नावावर अधिकारी, कंपनी मालामाल; चौकशी करण्याची शिवसेनेची मागणी

लातूर :- शेतकर्यांच्या जिवनात उन्नती व्हावी, शेतीत हरीत क्रांती घडावी, बारामाही शेतीत उत्पादन क्षमता निर्माण हाच उद्देश डोळ्यासमोर ठेऊन माजी मुख्यमंत्री व शिवसेनेचे पक्षप्रमुख मा. उद्धवसाहेब ठाकरे यांच्या कार्यकाळात शेतकर्यांना विजेचा वापर पुरेपुर मिळावा या हेतून मुख्यमंत्री कृषी सौर उर्जा योजना ९०/९५ टक्के अनुदानावर चालु करण्यात आली होती. सदर योजनेचा लाभ सिंचन कृषी क्षेत्रासाठी शेतकरी वर्गाला व्हावा, विजेचा लपंडावाला कंटाळलेल्या शेतकर्याला बारामाही शेतीत पाणी देण्याची सोय व्हावी, सदर योजना फलदायी ठरत असल्याचे लक्षात आल्यानंतर विद्यमान सरकारने या योजनेची व्याप्ती वाढवून मोठ्या प्रमाणात खाजगी कंपनीला कंत्राट देऊन अंमलात आणली असल्याने या योजनेत लातूर विभागीय महावितरण कार्यालयाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात घोटाळा झालेला असून प्रत्यक्षात लाभार्थी शेतकर्यांना त्याचा लाभ न होता यावर ऑनलाईन सिस्टममध्ये हेराफेरी करून योजना मंजूर शेतकरी वेगळा व प्रत्यक्षात लाभ आगाऊ रक्कम घेऊन इतरत्र शेतकर्यांच्या शेतीत हा सौरउर्जापंप बसवण्यात आल्याचा प्रकार निलंगा, शिरूर अनंतपाळ तसेच संपूर्ण जिल्ह्यात झाल्याचा उघडकीस आलेला असून शेतकर्यांच्या नावावर वितरण कंपनी व महावितरण अधिकारी मालामाल झालेले आहेत. या योजनेचा फटका निलंगा विधानसभा मतदार संघातील





५०० शेतकर्यांना बसलेला असून सदर योजनेत लाखो रूपयांचा घोटाळा झाला असल्याचा आरोप शिवसेनेच्या वतीने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे) निलंगा विधानसभा प्रमुख सोमनाथ स्वामी डिगोळकर यांनी केलेला असून सदरील भ्रष्ट अधिकारी व कंपनी संचालकावर चौकशी करून कार्यवाही करावी अशा मागणीचे निवेदन नुकतेच लातूर महावितरणाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे, अधिक्षक अभियंता मदन सांगळे, यांना त्यांच्या कार्यालयात भेटून निवेदन देऊन केली आहे. सदरील निवेदनात लातूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील शेतकर्यांनी सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरलेला होता. त्यानंतर तसा योजना मंजूर झाल्याचा मॅसेज त्यांना प्राप्त झाला. परंतू नंतर कंपनीच्या वतीने त्रुटी दाखून मंजूरी रद्द करून सदर अर्ज परत आयडी नंबर चेंज करून इतर शेतकर्याच्या नावावर सौर पंप मंजूर करून त्यांच्या शेतीत वितरण कंपनीने आगाऊ रक्कम घेऊन बसविण्यात आलेला आहे. शेतकर्यांचा स्वहिस्सा स्वतः कंपनीने भरली, शेतकर्यांच्या सह्या व अधिकार्यांच्या सह्या तसेच स्थळ पंचनामा आणि कार्यालयीन शिक्का ही बनावटीचे आढळतात. सदर योजना वितरण कंपनी व दलाल तसेच संबंधीत महावितरणच्या अधिकार्यांनी एकत्रितपणे मिळून या योजनेत लाखोचा घोटाळा करून शासनाला एका पंप जोडणीसाठी साडेतीन लाखाचा चुना लावला असून शेतकर्यांच्या नावे दलाली करून अधिकारी व कंपनी हे मालामाल झाले असल्याचे या प्रकरणावरून स्पष्ट होत आहे. सदर योजना मंजूर झालेले व वर्षानुवर्षे योजनेच्या लाभासाठी प्रतिक्षेत असलेले शेतकरी बांधवांना या योजनेचा फटका बसलेला असून संबंधीत शेतकरी बांधवांनी न्यायासाठी शिवसेनेकडे धाव घेतलेली होती. या बाबतची सत्य परिस्थिती पाहण्यासाठी शिवसेनेच्या टिमने प्रत्यक्ष शेतकर्याच्या शेतीबांधावर जाऊन चौकशी केली असता सदर घोटाळ्याची व्याप्ती फार मोठी असल्याचे समजते व शेतकर्याची फासवणुक केल्याचे दिसते. ही बाब म्हणजे शेतकरी बांधवांच्या टाळूवरचे लोणी खाणारे महावितरणचे भ्रष्ट अधिकारी व पुरवठा करणारी वितरण कंपनी यांची सखोल चौकशी करून कठोर कारवाई करावी अशी मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आलेली असून एक महिन्याच्या आता शेतकर्यांना मंजूर असलेला सौर उजार्् कृषी पंप संबंधीत शेतीत नाही बसविल्यास तसा निर्णय शासन व प्रशासनाने न घेतल्यास भविष्यात शिवसेना स्टाईनलने महावितरणच्या कार्यालयावर तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा महावितरणाला देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे. सदर निवेदनावर शिवसेनेचे निलंगा निधानसभा प्रमुख सोमनाथ स्वामी डिगोळकर, जेष्ठ शिवसैनिक त्र्यंबक गुरूनाथ स्वामी लातूर, शेतकरी प्रतिनिधी म्हणून दत्तात्रय लोभे निलंगा यांच्या स्वाक्षर्या आहेत.

## संपादकीय....

### करार शेतीतील सौदाशक्ती

तीव्र विरोधामुळे सरकारने तीन कृषीसुधारणा कायदे मागे घेतले. परंतु या कायद्यातील उणीवा दूर करण्यासाठी पद्धतशीर अभ्यासाची गरज आहे. तीव्र विरोधामुळे सरकारने तीन कृषीसुधारणा कायदे मागे घेतले. परंतु या कायद्यातील उणीवा दूर करण्यासाठी पद्धतशीर अभ्यासाची गरज आहे. तशा प्रकारच्या एका अभ्यासातून समोर आलेली ठळक बाब म्हणजे, सरकारने शेतकरी व व्यापारी संस्थांमधील माहितीच्या अभावाची मोठी पोकळी भरून काढण्याची गरज. देशातील वातावरण तीन कृषी कायद्यांच्या निमित्ताने ढवळून निघाले होते. आंदोलनाच्या रेट्यामुळे सरकारने माघार घेतली. याला दोन वर्षे झाली. खरे तर भारतीय शेतीच्या दृष्टीने हा विषय इतका महत्त्वाचा आहे, की त्याचा वस्तुनिष्ठ अभ्यास व्हायला हवा. केंद्राच्या या कायद्यांबाबत जे आक्षेप घेतले होते, त्यापैकी एक प्रमुख म्हणजे 'या सुधारणा योग्य ती संस्थात्मक संरचना आणि मूलभूत सुविधा निर्माण न करताच केल्या गेल्या.परिणामी शेतकऱ्यांना आपल्या उत्पादनाची योग्य ती व्यवस्था लावण्यात अडथळे निर्माण झाले', असे अनेक अर्थतज्ज्ञांना वाटले. या सुधारणा मंडी, अर्थात कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरतील, असा मतप्रवाह होता.या तीन कृषी कायद्यांपैकी शेतकऱ्यांसाठी हमीभाव आणि कृषीसेवा कायदा (फार्मर्स ग्रीमेंट ऑन प्राईज श्युरन्स अँड फार्म सर्व्हिसेस ऍक्ट–२०२०) संस्थात्मक आर्थिक रचनेच्या दृष्टिकोनातून तपशीलवार समजून घेण्याचा प्रयत्न करूया! आजवर भारतातील करारशेती प्रणालीचा अभावानेच संख्यात्मक अभ्यास केला गेला. सरकारने प्रायोगिक कृषी उत्पन्न बाजार समिती कायदा (एपीएमसी) २००३ मध्ये तयार केला. राज्य सरकारांना तो कायदा आपापल्या राज्यांत अंमलात आणण्याच्या सूचनाही दिल्या. २०१७ पर्यंत २१ राज्यांनी हा कायदा अंगीकारला. करार शेतीच्या सबलीकरणासाठी केंद्र सरकारने २०१८मध्ये एक नमुना 'करार शेती आणि सुविधा कायदा' संमत केला. कृषीमालाच्या व्यापारात मूलभूत सुधारणा घडवणे व खासगी क्षेत्रासाठी दारे खुली करण्यासाठी हे तीन कृषी कायदे सरकारने संमत केले होते.करार शेतीचा विचार करता, ही शेतकरी आंदोलने प्रामुख्याने करार करणाऱ्या उत्पादक संस्थांचे संधी आणि फायदाकेंद्रित वर्तन या दोन गोष्टींविरुद्ध होती. कारण यामुळे शेतकऱ्यांचा एकूण व्यवहारांसाठी येणारा खर्च (ट्रान्झॅक्शन कॉस्ट) वाढतो. या लेखात 'व्यवहारखर्चा'च्या शेतकऱ्यांच्या नफ्यावर होणाऱ्या परिणामाचा संख्यात्मक अभ्यास केला आहे.माहितीखर्च, म्हणजेच 'इन्फर्मेशन कॉस्ट' (आयसी) हीदेखील उलाढाल प्रक्रियेत अंतर्भूत असते. उदा. खरेदी, विक्री, उत्पादनमाहिती आणि करारासुयोग्य उत्पादनसंस्थेची निवड करणे या सर्वांचा समावेश या प्रक्रियेत आहे. तसेच, विशिष्ट नियम आणि अटींच्या अभावामुळे शेतकऱ्यांना सौदा खर्चाचाही अतिरिक्त भार पडतो.नोबेल पुरस्कार विजेते रोनाल्ड कोस, डग्लस नॉर्थ आणि ऑलिव्हर विल्यम्सन यांच्या म्हणण्यानुसार, विस्कळीत माहिती, संधीकेंद्रित वर्तन आणि नियम व अटींचा अभाव यांमुळे निर्माण होणाऱ्या खर्चाचा शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम होतो. विशिष्ट ठोस आकडेवारीअभावी अशा अभ्यासात अडथळे येतात. ही पोकळी भरून काढण्यासाठी आम्ही क्षेत्रविशिष्ट पातळीवर प्राथमिक सर्वेक्षण केले.यामध्ये कर्नाटकातील कोलार जिल्ह्यात प्रामुख्याने मिरचीचे पीक काढणाऱ्या तीनशे शेतकऱ्यांचा समावेश होता. ही सुपरमार्केट्स किंवा मोठे विक्रेते फळे व भाज्या यांच्या करार शेतीमध्ये उतरण्यासाठी पूर्वउद्योग एकीकरणाचा (बॅकवर्ड इंटिग्रेशन) पर्याय निवडतात. बाजारपेठेसाठी रोजच्या पुरवठ्याची तरतूद म्हणून हे केले जाते. यामध्ये राज्यात सुमारे तीस संघटित किरकोळ विक्रेते कार्यरत आहेत.शेतकऱ्यांकडून थेट फळे आणि भाज्या यांच्या पुरवठ्यासाठी त्यांचे उत्पादनकरार आणि विपणन करार झालेले असतात. उत्पादनकरार म्हणजे 'तांत्रिक सहाय्य, रासायनिक व खतांचा पुरवठा आणि निश्चित किंवा ठराविक किंमतीमध्ये त्याची आगाऊ खरेदी' या गोष्टी अंतर्भूत असतात. विपणन करार किंवा मार्केटिंग काँट्रॅक्टस याचा अर्थ रसायने, खते याबाबतीतील तांत्रिक सहाय्य्य आणि पारंपरिक बाजारपेठेतील भावापेक्षा जास्त भावाने ती खरेदी करणे.आमच्या संशोधनानुसार उत्पादनकरार करणाऱ्या शेतकऱ्यांचा नफा प्रतिएकर ५३ हजार ६९९ वरून ४० हजार ३३१ रुपयांवर (२४.९टक्के) घसरला. तर मार्केटिंग कॉन्ट्रॅक्ट किंवा विपणन करार करणाऱ्या शेतकऱ्यांचा नफा प्रतिएकर ३९ हजार ५७३वरून ३१ हजार १९७पर्यंत (२१.२टक्के) घसरला. मिरचीच्या पिकासंदर्भातील ही आकडेवारी आहे.बाजार समितीच्या शेतकऱ्यांच्या तुलनेत 'पीसी' (प्रॉडक्ट काँट्रॅक्टिंग) शेतकऱ्यांना ६७.१४टक्के एवढा अधिक नफा झाला; तर 'एमसी' (मार्केटिंग कॉन्ट्रॅक्ट) शेतकऱ्यांना १७ टक्के अधिक नफा झाला. आमच्या निष्कर्षांनुसार, 'पीसी' आणि 'एमसी' शेतकऱ्यांचा निव्वळ नफा आणि खरेदीमूल्य हे 'एपीएमसी' शेतकऱ्यांच्या तुलनेत बरेच जास्त असल्याचे आढळून आले.'एपीएमसी' शेतकऱ्यांशी तुलना करता अंदाजे व्यवहारखर्च 'पीसी' शेतकऱ्यांच्या एकूण खर्चाच्या १४. ६टक्के; तर 'एमसी' शेतकऱ्यांचा सहा टक्के एवढा होता. एकूण व्यवहारखर्च हा 'एपीएएमसी' शेतकऱ्यांशी तुलना करता 'पीसी' शेतकऱ्यांसाठी नऊ हजार१७८ रुपयांनी, तर 'एमसी' शेतकऱ्यांसाठी पाच हजार३९४ रुपयांनी अधिक होता. याचाच अर्थ संस्थात्मक यंत्रणा जर मजबूत आणि छोट्या शेतकऱ्यांनाही सामावून घेणारी असती तर प्रचलित व्यवहार/सौदे तसेच इतर खर्च मोठ्या प्रमाणावर कमी झाले असते.२०२० चा कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग कायदा हा बाजारपेठेतील विशिष्ट स्पर्धेला गृहीत धरूनच केला आहे. शिवाय, दोन्ही बाजू या करारांच्या अटी व शर्ती निश्चित करण्यासाठी सक्षम व तुल्यबळ आहेत, हेही गृहीत धरले होते. मात्र यासाठी सरकारने सक्षम यंत्रणा निर्माण केलेली नव्हती. विशेषतः फळे व भाज्यांबाबतीत याचा फटका अधिक बसला.हा कायदा शेतकरी व काँट्रॅक्ट फर्म्सदरम्यान व्यापारी संबंध प्रस्थापित करण्यावर भर देतो. मात्र त्यासाठी सक्षम यंत्रणा पुरवत नाही.

# गस्त आणि देखरेख क्रियाकलापांचा समावेश!

(भारतीय तटरक्षक दल दिवस.)

रताच्या विशाल किनारपट्टीचे रक्षण करण्यासाठी विशेष सागरी दलाची गरज सन १९७१च्या भारत–पाक युद्धादरम्यान जाणवली. भारतीय नौदलाला आपल्या संसाधनांचा एक महत्त्वाचा भाग किनारपट्टीवर पाळत ठेवण्यासाठी आणि गस्त घालण्यासाठी वळवावा लागला, ज्यामुळे देशाच्या सागरी हितसंबंधांचे रक्षण करण्याच्या त्याच्या प्राथमिक भूमिकेत अंतर निर्माण झाले होते. ही तफावत ओळखून भारत सरकारने दि.१ फेब्रुवारी १९७७ रोजी भारतीय तटरक्षक दलाची स्थापना करून एक ऐतिहासिक पाऊल उचलले. सागरी सुरक्षा वाढवणे, तस्करी रोखणे आणि सागरी आपत्कालीन परिस्थितीला प्रतिसाद देणे हे प्राथमिक उद्दिष्ट होते. अधिक रोचक व ज्ञानवर्धक माहिती सदर श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरुजींच्या संकलित लेखात वाचा... संपादक. भारतीय तटरक्षक दलाच्या स्थापनेचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी १ फेब्रुवारी रोजी तो साजरा केला जातो. भारताच्या विशाल सागरी हितांचे रक्षण करण्यासाठी तटरक्षक दलाच्या समर्पित सेवा आणि अमूल्य योगदानाची दखल घेत या दिवसाला खूप महत्त्व आहे. भारतीय तटरक्षक दल, एक निमलष्करी दल, देशाच्या सागरी सीमांचे रक्षण करण्यात, सागरी सुरक्षा सुनिश्चित करण्यात आणि विविध सागरी आव्हानांना प्रतिसाद देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. भारतीय तटरक्षक दल–आईसीजीची स्थापना झाली. भारतीय तटरक्षक दलाची स्थापना ही सागरी सुरक्षा वाढविण्यासाठी आणि भारताच्या विशाल किनारपट्टीचे रक्षण करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल होते. हा दिवस महत्त्वाचा आहे, कारण तो केवळ एक शक्तिशाली सागरी दलाच्या जन्माचे स्मरण करत नाही तर देशाच्या सागरी हितसंबंधांची सुरक्षा आणि संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी भारतीय तटरक्षक दलाने केलेल्या अमूल्य योगदानाची ओळख देखील करतो. आपण भारतीय तटरक्षक दलाचा इतिहास, त्याची भूमिका आणि जबाबदाऱ्या, त्यांची उपलब्धी आणि त्यांचे ध्येय पूर्ण करताना येणाऱ्या आव्हानांचा सखोल अभ्यास करू. ूमिका आणि जबाबदाऱ्या: सागरी सुरक्षा– भारतीय तटरक्षक दलाला भारताच्या सागरी सीमांची सुरक्षा सुनिश्चित करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. यामध्ये विशेषत: संवेदनशील भागात अनधिकृत प्रवेश आणि जहाजांचे निर्गमन रोखण्यासाठी गस्त आणि देखरेख क्रियाकलापांचा समावेश आहे. शोध आणि बचाव– तटरक्षक दलाच्या महत्त्वपूर्ण कार्यांपैकी एक म्हणजे समुद्रात जीव वाचवण्यासाठी शोध आणि बचाव कार्य करणे. ते संकट कॉलला प्रतिसाद देतात, बचाव प्रयत्नांचे समन्वय साधतात आणि संकटात असलेल्या नाविकांची सुरक्षा सुनिश्चित करतात. सागरी कायद्याची अंमलबजावणी– तटरक्षक दल समुद्रात कायद्याची अंमलबजावणी करणारी एजन्सी म्हणून काम करते, सागरी कायदे आणि नियमांची अंमलबजावणी करते. ते सागरी क्षेत्रात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तस्करी, चाचेगिरी आणि बेकायदेशीर मासेमारी यांसारख्या बेकायदेशीर कृत्यांचा मुकाबला करतात. पर्यावरण संरक्षण– सागरी पर्यावरणाचे संरक्षण हे तटरक्षक दलाच्या जबाबदाऱ्यांचा एक महत्त्वाचा पैलू आहे. ते तेल गळतीला प्रतिसाद देतात, प्रदूषण प्रतिसाद कार्ये चालवतात आणि सागरी परिसंस्थेच्या संरक्षणात योगदान देतात. मानवतावादी सहाय्य– चक्रीवादळ, पूर किंवा त्सुनामी यांसारख्या नैसर्गिक आपत्तींच्या वेळी, कोस्ट गार्ड मानवतावादी मदत प्रदान करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. ते बाधित भागातून लोकांना बाहेर काढतात, मदत पुरवठा करतात आणि आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रयत्नांना हातभार लावतात. भारतीय तटरक्षक दिनाचे महत्त्व: भारतीय तटरक्षक दिन हा या सागरी दलात सेवा करणाऱ्या स्त्री–पुरुषांच्या अदम्य भावनेची आणि वचनबद्धतेची कबुली देणारा प्रतिबिंब आणि उत्सवाचा दिवस आहे. देशाच्या सागरी सीमांचे रक्षण करण्यासाठी त्यांचे त्याग, समर्पण आणि अटूट संकल्प ओळखण्याची संधी देते. सागरी सुरक्षेसाठी योगदान गेल्या काही वर्षांत भारतीय तटरक्षक दलाने या प्रदेशात सागरी सुरक्षा वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. काही महत्त्वपूर्ण योगदानांमध्ये हे समाविष्ट आहे. तस्करी आणि बेकायदेशीर क्रियाकलापांना प्रतिबंध करणे– माल, अंमली पदार्थ आणि शस्त्रास्त्रांची तस्करी यासारख्या बेकायदेशीर क्रियाकलापांना प्रतिबंध करण्यासाठी आईसीजी सागरी सीमांवर सक्रियपणे गस्त घालते आणि देखरेख करते. दहशतवादविरोधी कारवाया– सागरी दहशतवादाच्या वाढत्या धोक्यामुळे, भारतीय तटरक्षक दल समुद्रावरील दहशतवादाच्या कृत्यांचा मुकाबला आणि प्रतिबंध करण्याच्या प्रयत्नांमध्ये आघाडीवर आहे. शोध आणि बचाव कार्ये– सागरी अपघात आणि आपत्तींच्या वेळी आपल्या तत्पर आणि प्रभावी शोध आणि बचाव कार्यांद्वारे असंख्य लोकांचे जीव वाचवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. पर्यावरण संरक्षण– सागरी प्रदूषण रोखण्यासाठी आणि नियंत्रित करण्यासाठी सक्रिय उपाययोजना करून सागरी पर्यावरणाच्या संरक्षणात योगदान देते. क्षमता वाढवणे आणि सहयोग– भारतीय तटरक्षक दल आपली क्षमता वाढवण्यासाठी आणि प्रभावी सागरी सुरक्षेसाठी गुप्तचर सामायिक करण्यासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अशा इतर सागरी एजन्सीसोबत सहयोग आहे. उपलब्धी आणि उल्लेखनीय ऑपरेशन्स– गेल्या काही वर्षांत भारतीय तटरक्षक दलाने विविध यशस्वी ऑपरेशन्सद्वारे व्यावसायिकता आणि कार्यक्षमतेसाठी नावलौकिक मिळवला आहे. काही उल्लेखनीय कामगिरीमध्ये हे समाविष्ट आहे. ऑपरेशन स्वान–१९८८– भारतीय किनारपट्टीवर प्रतिबंधित वस्तू, विशेषत: सोन्याच्या तस्करीला सामोरे जाण्यासाठी ऑपरेशन स्वान सुरू करण्यात आले. तटरक्षक दलाने अवैध कृत्यांना आळा घालण्यासाठी आपली प्रभावीता दाखवून तस्करीच्या अनेक जहाजांना यशस्वीरित्या रोखले. ऑपरेशन ताशा–१९९९– कारगिल युद्धादरम्यान, तटरक्षक दलाने भारताच्या सागरी सीमा सुरक्षित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. ऑपरेशन ताशामध्ये पाकिस्तानच्या संभाव्य नौदलाच्या धोक्यांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि संरक्षण करण्यासाठी तटरक्षक जहाजांच्या तैनातीचा समावेश होता. शोध आणि बचाव कार्ये– तटरक्षक दलाने अनेक शोध आणि बचाव कार्ये राबवून समुद्रात असंख्य जीव वाचवले आहेत. उल्लेखनीय उदाहरणांमध्ये सन २००४च्या हिंदी महासागरातील सुनामीला मिळालेला प्रतिसाद आणि चक्रीवादळात मच्छिमारांची सुटका यांचा समावेश आहे. चाचेगिरी विरोधी ऑपरेशन्स– भारतीय तटरक्षक दलाने एडनच्या आखात आणि अरबी समुद्रात चाचेगिरीचा सामना करण्यासाठी आंतरराष्ट्रीय प्रयत्नांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. त्यांच्या उपस्थितीने या चाचेगिरी–प्रवण क्षेत्रांमध्ये शिपिंग लेनच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. भारतीय तटरक्षक दलासमोरील आव्हाने: भारतीय तटरक्षक दलाने सागरी सुरक्षेची खात्री करण्यासाठी लक्षणीय प्रगती केली असताना ती विविध आव्हानांना तोंड देत आहे, ज्यासाठी लक्ष आणि धोरणात्मक नियोजन आवश्यक आहे. तांत्रिक सुधारणा– प्रभावी सागरी पाळत ठेवण्यासाठी आणि प्रतिसादासाठी तांत्रिक प्रगतीच्या बरोबरीने राहणे महत्त्वाचे आहे. आईसीजीला आधुनिक उपकरणे आणि तंत्रज्ञानामध्ये सतत गुंतवणूक करणे आवश्यक आहे. कार्मिक प्रशिक्षण आणि भरती: अत्यंत सक्षम आणि प्रेरित शक्ती राखण्यासाठी कुशल कर्मचाऱ्यांची भरती आणि प्रशिक्षण आवश्यक आहे. कोस्ट गार्ड कर्मचाऱ्यांचे कौशल्य वाढवण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी पुरेशा संसाधनांचे वाटप केले जावे. पायाभूत सुविधांचा विकास– भारतीय तटरक्षक दलाला संपूर्ण किनारपट्टीवर आपली उपस्थिती मजबूत करण्यासाठी नवीन तळांची स्थापना आणि विद्यमान सुविधा अपग्रेड करण्यासह सतत पायाभूत सुविधांच्या विकासाची आवश्यकता आहे. अत्याधुनिक धोके– दहशतवाद आणि संघटित गुन्ह्यांसह सागरी धोक्यांच्या विकसित स्वरूपासाठी तटरक्षक दलाला त्याच्या क्षमतांमध्ये सतत सुधारणा करणे आवश्यक आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि प्रशिक्षणामध्ये गुंतवणूक करणे अत्याधुनिक विरोधकांच्या पुढे राहण्यासाठी महत्त्वाचे आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्य: आंतरराष्ट्रीय सागरी धोक्यांना संबोधित करण्यासाठी शेजारील देश आणि आंतरराष्ट्रीय सागरी संघटनांशी सहकार्य करणे अत्यावश्यक आहे. सामुहिक सागरी सुरक्षेसाठी राजनैतिक संबंध आणि माहितीची देवाणघेवाण यंत्रणा मजबूत करणे महत्त्वाचे आहे. पर्यावरणीय आव्हाने– पर्यावरण संरक्षणावर अधिकाधिक लक्ष केंद्रित करून भारतीय तटरक्षक दलाला हवामान बदल, सागरी जैवविविधता आणि शाश्वत सागरी पद्धतींशी संबंधित उदयोन्मुख आव्हानांशी जुळवून घेणे आवश्यक आहे. भारतीय तटरक्षक दिवस सेलीब्रेशन: भारतीय तटरक्षक दिन देशभरात उत्साहात आणि अभिमानाने साजरा केला जातो. या प्रसंगी विविध कार्यक्रम आणि उपक्रम आयोजित केले जातात, यासह– परेड आणि समारंभ– औपचारिक परेड आणि समारंभ कोस्ट गार्ड स्टेशन्स आणि मुख्यालयात सेवा कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यासाठी आणि सैन्याच्या क्षमतांचे प्रदर्शन करण्यासाठी आयोजित केले जातात. पुरस्कार समारंभ– तटरक्षक दलाच्या कर्मचाऱ्यांना वर्षभरात त्यांच्या अपवादात्मक सेवेसाठी आणि शौर्यासाठी ओळख आणि पुरस्कार दिले जातात. सार्वजनिक जागरुकता कार्यक्रम– भारतीय तटरक्षक दल सागरी सुरक्षा, समुद्रातील सुरक्षितता आणि देशाच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी तटरक्षक दलाच्या भूमिकेबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी सार्वजनिक पोहोच उपक्रमांमध्ये गुंतले आहे. प्रात्यक्षिके आणि प्रदर्शने– आईसीजी अनेकदा प्रात्यक्षिके आणि त्यांची उपकरणे आणि क्षमतांचे प्रदर्शन आयोजित करते, ज्यामुळे जनतेला सैन्याची तयारी आणि सज्जता प्रत्यक्षपणे पाहता येते.भारतीय तटरक्षक दिन हा एक महत्त्वाचा प्रसंग आहे, जो केवळ महत्त्वाच्या सागरी दलाच्या स्थापनेचा उत्सवच साजरा करत नाही तर देशाच्या सागरी सीमांचे रक्षण करणाऱ्या व्यक्तींच्या समर्पणाला आणि शौर्यालाही श्रद्धांजली अर्पण करतो. भारताने सागरी क्षेत्रात आपला प्रभाव कायम ठेवल्याने भारतीय तटरक्षक दलाची भूमिका अधिकाधिक गंभीर होत आहे. सतत आधुनिकीकरण, प्रशिक्षण आणि सहकार्याद्वारे, भारतीय तटरक्षक दल समुद्रात राष्ट्राची सुरक्षा, सुरक्षितता आणि समृद्धी सुनिश्चित करण्याच्या आपल्या वचनबद्धतेमध्ये स्थिर आहे. या दिवशी आपण भारतीय तटरक्षक दलाच्या कर्तृत्वावर चिंतन करूया आणि आपल्या सागरी हितांचे अतूट दृढनिश्चय आणि धैर्याने रक्षण करणाऱ्या शूर पुरुष आणि महिलांबद्दल कृतज्ञता व्यक्त करूया. आपण इंडियन कोस्टगार्ड डे साजरा करत असताना या निमलष्करी दलात सेवा करणाऱ्या स्त्री–पुरुषांच्या त्याग आणि समर्पणाची कबुली देणे अत्यावश्यक आहे. देशाच्या सागरी सीमांचे रक्षण करण्याची त्यांची वचनबद्धता कौतुकास पात्र आहे. पुढे पाहता, तटरक्षक दलाच्या क्षमतांमध्ये गुंतवणूक करणे सरकारसाठी महत्त्वाचे आहे, हे सुनिश्चित करून की ते आगामी वर्षांत विकसित होत असलेल्या सागरी आव्हानांना तोंड देण्यासाठी सुसज्ज राहतील. भारतीय तटरक्षक दिन दरवर्षी १ फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो. १९७७ मध्ये या दिवशी भारतीय तटरक्षक दलाच्या स्थापनेचे स्मरण केले जाते. भारताच्या सागरी हितसंबंधांची सुरक्षा आणि संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी आणि सागरी कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी भारतीय तटरक्षक दलाची स्थापना करण्यात आली.भारतीय तटरक्षक दलाची स्थापना अधिकृतपणे दि.१ फेब्रुवारी १९७७ रोजी तटरक्षक कायद्यांतर्गत करण्यात आली. भारतीय तटरक्षक दलाची प्राथमिक भूमिका म्हणजे भारताच्या सागरी हितांचे रक्षण करणे आणि देशाच्या प्रादेशिक सागरी भागात कायद्यांची अंमलबजावणी करणे. यामध्ये शोध आणि बचाव कार्य, पर्यावरण संरक्षण आणि सागरी धोक्यांचा सामना करणे समाविष्ट आहे, हे विशेष!!! राष्ट्रीय तटरक्षक स्थापना दिनाच्या सर्व भावाबहिणींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

***************

**– संकलन व सुलेखन –**
**श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजी.**
**गडचिरोली, फक्त व्हॉट्सप–**
**९४२३७१४८८३.**

# निसर्गाने मानवाला जे काही मोफत दिले त्याचा योग्य वेळी लाभ घावा.



निसर्गाने मानवाला जे काही मोफत दिले त्याची त्याला किंमत नाही.तीच औषध विकत घेतली की त्याचे महत्व वाटते. तसंच खोल श्वास परिपुर्ण औषध–बाबत झाले आहे.श्वास आयुष्याचा आधार आहे. मन आणि जीवनामधील रहस्यमय दोरी आहे जिच्या आधारे कोणीही प्राणी आयुष्यात पाऊल ठेवतो. म्हणून शारीरिक संरचनेत श्वासाच्या गतीचे स्थान महत्त्वपूर्ण आहे, कारण श्वासाची गती वाढल्याने शरीराचे तापमान वाढते त्याला पण वय कमी होण्याचा कारक व अल्पायुचा संकेतांक म्हणू शकतो.धापा टाकणारे जनावर याचा पुरावा आहेत,धापा टाकण्याची गती जेवढी तीव्र असेल, मरण्याची निश्चितता तेवढी वाढेल हे एक नैसर्गिक व शास्त्रीय तथ्य आहे.जसे कबूतर एक मिनिटात ३७ वेळा श्वास घेते आणि केवळ नऊ वर्ष जिवंत राहते.ससा देखील दर मिनिटाला ३९ वेळा श्वास घेतो आणि त्याचे वय जवळपास नऊ वर्ष मानले गेले आहे. कुत्रा १ मिनिटात २९ वेळा श्वास घेतो आणि १३ वर्षे जिवंत राहतो.बकरी २४ वेळा,तर हत्ती १ मिनिटात ११ वेळा श्वास घेऊन १०० वर्ष जिवंत राहतो.कासव १ मिनिटात केवळ ४ श्वास घेऊन १५० वर्षांचे दीर्घायुष्य जगतो. मनुष्यासाठी सामान्यतः जीवेत् शरद शतम् ची म्हण प्रचलित आहे. याचा अर्थ आहे की कधी त्याच्या श्वासांची गती निश्चितच त्यात सरासरीची राहिली असेल की तो किमान १०० वर्ष जगू शकेल,अर्थात ११ ते १२ श्वास दर प्रति मिनिट असायला पाहिजे.



आज मनुष्याचा श्वास दर वाढल्याने त्याच प्रमाणात त्याचे आयुष्य देखील घटले आहे. सरासरी आयुष्य ६० ते ६५ वर्ष राहिले.अनेक आधुनिक शास्त्रज्ञांचे मानणे आहे की जर मनुष्याच्या शारीरिक तापमानाला अर्धे केले जाऊ शकले,तर तो सहजपणे १००० वर्षांपर्यंत जगू शकतो,यासाठी त्याला आपल्या श्वासाच्या गतीला साधून त्याच प्रमाणात मर्यादित करावे लागेल. याचा अर्थ आहे. मनुष्याच्या श्वासाच्या गतीला प्रति मिनिट २ ते ३ पर्यंत नियंत्रित करणे. हे खूप आव्हानात्मक तर आहे पण अशक्य नाही. प्राचीन काळात ऋषींच्या हजारो वर्षापर्यंत जिवंत राहण्याच्या तथ्यांवरून सिद्ध होते की दीर्घायुष्याचे रहस्य मनुष्याच्या श्वासाच्या गतीमध्ये लपले आहे.म्हणून आपण आपल्या श्वासाच्या गतीला साधण्यासाठी प्रथम तर श्वास – उच्छश्वासाच्या पद्धतीला समजणे आवश्यक आहे.

दुसरे आपल्या प्राणाला साधने,त्याचा एक निश्चित,दुष्परिणामरहित मार्ग प्राणायाम आहे. श्वासाच्या दोरीवर मानव जीवन आणि त्याचे आरोग्य टिकलेले आहे.श्वास जेवढा स्थिर,मजबूत असेल जीवन तेवढेच स्वस्थ आणि निरोगी असेल.श्वासात जेवढी जास्त गतिशीलता,तीव्रता येईल आरोग्याच्या शक्यता तेवढ्याच कमी होत जातील. हे शास्त्रीय तथ्य आहे. कारण श्वासाचा सरळ संबंध शरीराच्या तापमानाशी आहे.ज्या तीव्रतेने श्वास गतिशील होईल, त्याच प्रमाणात शरीराच्या तापमानात वाढ होईल.क्रोध,आवेश, उत्तेजनाच्या स्थितीमध्ये श्वासाच्या दरात अशा प्रकारची वाढ होते.खोल श्वास परिपुर्ण औषध खोल श्वास घेण्याचा अर्थ स्पष्ट करताना प्राण विज्ञान विशेष तज्ञ डॉक्टर मेकडॉवल म्हणतात की 'प्राणायामामूळे फुफ्फुसांनाच नाहीतर पोटाच्या संपूर्ण पचनसंस्थेला ही परिपूर्ण पोषण मिळते.खोल श्वास रक्तशुद्धीसाठी अमूल्य औषध घेण्यासारखे आहे.मनुष्याची कार्यक्षमता वाढवणे,त्यात स्फुर्ती व उल्हास जागवण्यात खोल श्वास घेण्याचा अभ्यास महत्त्वपुर्ण भुमिका निभावतो.म्हणूनच दिर्घायुष्यासाठी दररोज सातत्याने प्राणायाम करणे आवश्यक आहे.

२०२२ व २०२३ ला सकाळी सात ते नऊ सहा महीने योग शिबिरात प्रशिक्षण घेतले त्यात अनेक प्रकारचे आजार नष्ट करणारे आसन शिकविल्या गेले. त्यांचे नियमितपणे पालन केले तर शंभर टक्के शरीरातील अनेक आजार नष्ट होतात. काम धंदा करणे किंवा आठ तास नोकरी करण्यासाठी दररोज सकाळी एक दोन तास आणि संध्याकाळी एक दोन तास येण्या जाण्यात जातात त्यातून हे सकाळी सकाळी मोफत औषध घेणे अनेकांना शक्य होत नाही.तरी सर्वच लोक मोफत सल्ला देतात की निसर्गाने मोफत औषध दिले आहे त्याचा लाभ घेतला पाहिजे.सेवानिवृत होऊन मला तीन वर्ष झाले.पाय,दुखणे,कंबर दुखणे या कायम कमी जास्त प्रमाणात तक्रारी आहेत. सर्वांना योगा केल्याने आराम होतेच असे नाही. काही लोक सकाळी संध्याकाळी वीस मिनिटे पायी चालल्याने सुद्धा आराम होतो असे सांगतात. हे खरे आहे. असे अनेक प्रकार निसर्गाने मोफत दिले आहेत. त्याचा औषध म्हणून उपभोग घेतला पाहिजे. पण निसर्गाने प्रत्येक माणसाला प्राण्याला,पक्षाला पोट दिले आहे ते भरणे आणि खाली करणे हा पान दिनकर्म दिला आहे. त्याची वेळ चुकवली तर अनेक प्रश्न उभे राहतात. म्हणूनच मी आज वेगळ्या विषयावर लिहायला घेतले.कामावर असतांना दर तीन महिन्याने आरोग्य आणि सुरक्षा यावर विशेष दोन तीन दिवसाचे सेमिनार असायचे त्यावेळी त्याचे जास्त महत्व वाटत नव्हते,पण आता ते किती महत्वाचे सांगत होते हे आता समजते. निसर्गाने मानवाला जे काही मोफत दिले त्याचा योग्य वेळी लाभ घावा.

************

**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९,**
**भांडुप,मुंबई.**

# मूकनायकच्या १०४ व्या वर्धापनदिनानिमित्त 'पत्रकारितेचे मानवतावादी दृष्टीकोनातून चळवळीसाठी योगदान' या विषयावर वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : समाज जीवनात कार्यरत फुले शाहू आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करून वैचारिक आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी समग्र आंदोलन समजून घेणे आवश्यक आहे. आपण सर्वांना ज्ञात आहेच की, ३१ जानेवारी १९२० ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक या पाक्षिकाची सुरुवात केली होती. याची ऐतिहासिक जाणीव ठेवून वर्तमान काळात आपण कुठे आहोत? समग्र चळवळीचे नेतृत्व, कार्यकर्ते, संस्था, संघटना, अनुयायी, हितचिंतक नेमके काय करीत आहेत? यावर नव्याने विचारमंथन व्हावे म्हणून मूकनायक च्या १०४ व्या वर्धापनदिनानिमित्त मूकनायक सप्ताह अंतर्गत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे २८ जानेवारी २०२४ ला आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन निळे प्रतिक चे संपादक रतनकुमार साळवे यांनी केले. ते याप्रसंगी म्हणाले की, ३१ जानेवारी १९२० ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेल्या मूकनायकचे चळवळीसाठी योगदान लक्षात घेऊन फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या माध्यमातून संचालक बी. बी. मेश्राम यांनीयांनी आर्थिक व्यवहार बाजूला ठेवून आपली भूमिका पार पाडली पाहिजे म्हणून या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. हा एक समाजाला दिशा देणारा स्तुत्य उपक्रम आहे. याची आपण नोंद घेतली पाहिजे. त्यांची तळमळ लक्षात घेता चळवळीचे कार्य पुढे घेऊन जाण्यासाठी ही कृतीशीलता निश्चितच वाखाणण्यासारखी आहे. ज्या चळवळीचे वर्तमान पत्र नसेल तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्षा प्रमाणे होते. असे बाबासाहेब म्हणाले होते म्हणून विषमतेचे माहेरघर असलेल्या भारत देशात विषमतेची दरी रुंदावत चालली असताना समता प्रस्थापित करण्यासाठी त्या काळात मूकनायकचा जन्म झाला होता. मूकनायक हे एक न्यायाचे विचारपीठ होते.

या प्रसंगी एस. पी. मुंजाळ म्हणाले की, आपल्या कार्याला इतर वृत्तपत्रात पुरेशी जागा मिळत नसल्याने बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्रपणे आपल्या मूकनायक या पाक्षिकाची स्थापना केली. एड. विलास रामटेके म्हणाले की, मानवी मूल्यांवर आधारित विचार जगले पाहिजेत. विषमतेची दरी नष्ट करण्यासाठी जनतेचे प्रबोधन नीट झाले तर जनता त्या विचाराने पेटून उठेल. कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करण्यासाठी ही कार्यशाळा महत्वपूर्ण ठरत आहे. लहान मुलांप्रमाणे कार्यकर्त्यांवर संस्कार केले पाहिजेत. समाजातील ओबीसी, मराठा बांधव दुखावणार नाहीत, याची जाणीव ठेवून त्यांना जोडले पाहिजेत. धनराज गोंडाने म्हणाले की, कोणत्याही चळवळीला यशस्वी होण्यासाठी वृत्तपत्राची नितांत आवश्यकता आहे. १४ फेब्रुवारी १९२० ला बाबासाहेब म्हणाले होते की, इंग्रजी भाषा हे वाघिणीचे दुध आहे. पांडुरंग नंदराम भटकर हे त्या पत्रिकेचे संपादक होते. बाबासाहेब सुद्धा त्या काळात पत्रिका वाटायचे. करिता आपण निर्भीडपणे पत्रकारिता चालविली पाहिजे. आमच्या बहिष्कृत लोकांवर होणा-या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मूकनायकने पार पाडले. स्वहित जोपासताना समाजहित जोपासले पाहिजे. एड. राजू बागूल म्हणाले की, भारत देश विषमतेचे माहेरघर असून यात आप्रेस्ड, डिप्रेस्ड आणि सप्रेस्ड लोक राहायचे त्यांच्या उत्थानासाठी मूकनायकची सुरुवात झाली होती. आवाज इंडिया, दलित दत्तक सारख्या प्रसार माध्यमांची भूमिका आपण समजून घेणे आवश्यक आहे. तराळ-अंतराळ चे लेखक शंकरराव खरात यांनी पत्रकारितेची मजबूत भूमिका पार पाडली. पुढे ते विद्यापीठाचे कुलगुरू झालेत. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचा माणूस हा केंद्रबिंदू होता. म्हणून त्यांनी पुढे मानवतावादी दृष्टीकोनातून भारताचे संविधानाची निर्मिती केली आहे.

प्रमुख वक्ते समाधान ओंकार इंगळे म्हणाले की, लोकशाहीच्या उत्थानासाठी जनतेचे जनमत घडविण्याकरिता पत्रकारिता हा आजचा ज्वलंत विषय आहे. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेवर त्यांचे गुरुवर्य जान ड्युई यांच्या विद्वत्तेचा गाढा प्रभाव होता. म्हणून त्यांनी प्रबुद्ध भारताच्या उभारणीसाठी आपले आयुष्य वेचले. मानवतावादी दृष्टीकोनातून प्रतित्य समुत्पादाचा सिद्धांत प्रस्थापित केला पाहिजे. समाजवादी, साम्यवादी हे धर्म, अंधश्रद्धेचे प्रचार प्रसार करून त्यांची उद्दिष्टे पूर्ण करतात. बहुसंख्यांक समाज विभाजित असल्याने त्या विभाजित गटातील अल्पसंख्याक समाजाचे होकायंत्र दिशाहीन होत असल्याने लोकशाही धोक्यात



आली आहे. करिता आपण सजग राहून मार्गक्रमण केले पाहिजे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, जनतेचे जनमत तयार करण्यासाठी वृत्तपत्र हे प्रभावी माध्यम आहे. वृत्तपत्र वाचत असताना वाचकांनी दोन ओळीतील व दोन ओळी मागील ( इर्शींशशप ींहश श्रळपशी रपव इशहळपव ींहश श्रळपशी) सामावलेला गर्भितार्थ समजून घेतला पाहिजे. समाज जीवनात रस्त्यावर आंदोलन चालविण्यासाठी त्याची योजना मात्र अशाप्रकारच्या कार्यशाळेत अंतर्गत बंद दाराआड ठरविण्यात आली पाहिजे म्हणून कार्यशाळेचे चळवळीत अनन्यसाधारण महत्त्व आहे. स्थळ, काळ, वेळ आणि परिस्थितीचा विचार करून समयसूचकतेनुसार मार्गक्रमण केले पाहिजे. निष्पक्ष पत्रकारिता चालविण्यासाठी वृत्तपत्राचे संपादक मंडळ कसे असावे? याची संहिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ९ मार्च १९४० च्या जनता पत्रात अंतर्भूत केली आहे. त्याची आपण अंमलबजावणी केली पाहिजे. तत्कालीन परिस्थितीत बाबासाहेब आंबेडकरांनी काँग्रेस आणि गांधींनी अस्पृश्यांसाठी काय केले? असा प्रश्न विचारला होता. आज वर्तमानात देश स्वतंत्र झाल्यापासून काँग्रेससह युपीए आणि भाजपासह एनडीए यांनी मूलनिवासी बहुजन समाजाच्या उत्थानासाठी काय केले आहे? देशाच्या अर्थसंकल्पात संवैधानिक समूहांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात तरतूद केली जात आहे काय? असे प्रश्न आपण वर्तमान व्यवस्थेला विचारले पाहिजेत. एका काळात वृत्तपत्रे छापून विकली जात होती. आता मात्र प्रस्थापित वृत्तपत्राविषयी शंका आहे की, काय ती वृत्तपत्रे विकून छापली जातात? असे असेल तर कुठली वृत्तपत्रे विकत घेऊन आपण वाचली पाहिजेत? हे आपण ठरविले पाहिजे. करिता परिवर्तनवादी विचारांचा प्रचार प्रसार करणाऱ्या वृत्तपत्रांना वाचकवर्ग मिळावा यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. सध्या आपल्या बातम्यांना दैनिक सार्वभौम राष्ट्र, दैनिक यश सिद्धी, दैनिक तुफान क्रांती, दैनिक क्रांती शास्त्र, दैनिक महावृत्त, दैनिक घटनेचा शिल्पकार, दैनिक लोकमत, दैनिक सकाळ, दैनिक सामना, दैनिक लोकपत्र, दैनिक मुक्तनायक, निळे प्रतिक, पैगाम, बहुजन हिताय, लोक प्रसार, हिंदवी समाचार, लोक परिषद, विचार क्रांती न्यूज इत्यादी वृत्तपत्रे ठळक प्रसिद्धी देऊन परिवर्तनवादी विचारांचा प्रचार प्रसार करण्यासाठी सहकार्य करीत आहेत. या सर्वांचेच सहकार्य आपणास विसरता येणार नाही. तरी परिवर्तनवादी विचारांच्या वृत्तपत्राना जगविण्यासाठी आपण आटोकाट प्रयत्न करून धोक्यात आलेली लोकशाही वाचविली पाहिजे. तरच भारताचे संविधान अबाधित राहून समता, स्वतंत्रता, बंधुता व न्यायावर आधारित समाज निर्माण होऊ शकेल. हे करू शकलो तरच मूकनायकचे ऐतिहासिक महत्त्व आपणास कळाले असा त्याचा अर्थ होईल. म्हणून भिन्न भिन्न विषयावर सातत्याने वैचारिक प्रबोधनात्मक कार्यशाळेचे आयोजन करून आपण ऐतिहासिक चळवळीच्या इतिहासाला समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहोत.

कार्यशाळेला एस. पी. मुंजाळ, एड. विलास रामटेके, डी. टी. कांबळे, लोक परिषद चे संपादक प्रवीण बुरुडे, एड. राजू बागूल, धनराज गोंडाने, समाधान ओंकार इंगळे, निळे प्रतिक चे संपादक रतनकुमार साळवे, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

# वार्षिक स्नेहसंमेलन चक्रधर शाळेत उत्साहात संपन्न....

औसा प्रतिनिधी : - औसा शहरातील नवजीवन सेवाभावी संस्था द्वारा संचलित चक्रधर प्राथमिक व माध्यमिक या शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले असून यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे लातूर जिल्हाध्यक्ष डॉ. अफसर शेख होते तर कार्यक्रम अध्यक्ष म्हणून कॉग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरभैय्या खानापुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच या प्रसंगी युवक काँग्रेस लातूर जिल्हा उपाध्यक्ष हणमंत भैय्या राचट्टे, माजी नगराध्यक्ष जावेदजी शेख, माजी नगरसेवक गोपाळजी धानूरे, युवा उद्योजक इम्रान सय्यद, कृ. उ. बा. समिती संचालक विकासजी नरहरे, माजी नगरसेविका सौ. मंजुषाताई कसबे, कार्याध्यक्ष तालुका काँग्रेस) प्रशांतजी भोसले, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शहेबाज उस्मानी, संस्थापक सचिव शब्बीरजी शेख यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात माता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. सर्व मान्यवरांचे स्वागत सुमन गीताने करण्यात आले. तसेच उपस्थिती मान्यवरांचे वृक्षरोप, शॉल, श्रीफळ व फेटे बांधून सत्कार करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे संस्थेतर्फे विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले, यात यावर्षीचा आदर्श शिक्षक म्हणून मुल्ला रौफ सिकंदर, धानुरे आशिष विश्वंभर यांना तर आदर्श पालक म्हणून,




पटेल अखलाख सालार व सातपुते महादेव यांना प्रदान करण्यात आला. तसेच आदर्श विद्यार्थी म्हणून कु. शिंदे ब्रह्मानंद व्यंकट, कु. करपुडे इसमाईल अजीम, कु.पवार अदिती दयानंद, कु.शेख अदनान गणी या विध्यार्थ्यांना मान्यवरांचे हस्ते शॉल,सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यानंतर उपस्थित मान्यवरांपैकी काही मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करत कार्यक्रमास शुभेच्छा, तसेच शाळेचे, संस्थेची कार्यकारिणी यांचे कौतुक आपल्या शब्दांत केले. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमास सुरुवात झाली. या कार्यक्रमात विविध गीते जसे हरियानी, गरबा, दांडिया, देशभक्ती गीत,मंगळागौर, नाटक, गीतगायन, इत्यादी अश्या २५ गीतावर विद्यार्थ्यांनी आपले कलागुण (नृत्यगीत) सादर केले.या कार्यक्रमास महिला पालक, पाहुणे, पत्रकार,विविध शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षिका, ईतर कर्मचारी, विध्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. हा कार्यक्रम खास माता-भगिनींसाठी (नारी सशक्तीकरण करिता)आयोजित केला होता. हा संपूर्ण कार्यक्रम सोशल मीडिया फेसबुक पेजवर लाईव्ह ठेवण्यात आला आहे. याच्या माध्यमातून खूप पालकांनी हा कार्यक्रम पाहिला, त्याचा आनंद घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे सहशिक्षक आंदुरे सर यांनी केले तर, आभार अझहर सर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक-शिक्षिका, इतर कर्मचारी यांनी खूप मेहनत घेतली. शाळेचे मुख्याध्यापक सुलतान शेख सर, मुख्याध्यापक मोईज शेख सर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

# प्रणाली सेवाभावी महिला असोसिएशनच्या वतीने सामाजिक कार्यात आदर्श निर्माण करणाऱ्या स्त्री-पुरुषांचा सन्मान

मुंबई :- प्रणाली सेवाभावी महिला असोसिएशन, प्रज्ञा प्रतिष्ठान आणि सुकेशनी महिला बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने ७४ वा प्रजासत्ताक दिन व सामाजिक कार्यात आदर्श निर्माण करणाऱ्या स्त्री-पुरुषांचा सन्मान समारंभ गौतमी सुनील जाधव यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर प्रसंगी बौद्धजन पंचायत समितीचे सभापती, सरसेनानी आनंदराज आंबेडकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते तसेच भाजप, शिवसेना, रिपब्लिकन पक्षाच्या महिला पदाधिकारी, माजी नगरसेवक वसंत नकाशे, कल्पेश भितळे व टीम, प्रज्ञा प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनिल शिवराम कासारे, पोपट दिवेकर, संजीवन जैसवाल, प्रणाली सेवाभावी महिला असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष गौतमी सुनील जाधव, विशाखा जाधव, भगवान साळवी, विवेक जाधव संस्थेचे पदाधिकारी, सुकेशनी महिला बचत गटाच्या अध्यक्ष गौतमी जाधव, सावित्री हजारे, सुशीला सकपाळ, स्वाती देवळेकर, उत्कर्षा बैकर आदी उपस्थित होत्या, कठोर आव्हानांचा सामना करत समाजात खंबीरपणे उभे राहून आदर्श निर्माण करणाऱ्या शुभदा कांबळे, वनिता साळवी,



मंगेश जाधव, दर्शन जाधव, पी.जी.साळवी, भाई जोशी, महेंद्र पवार आदी महिला व पुरुषांना तसेच आंबेडकरी चळवळीस तन, मन, धन अर्पण करून निस्वार्थी वृत्तीने काम केलेल्या ८६ वर्षाचे लक्ष्मण बाबा वाघमारे यांना प्रणाली सेवभावी महिला असोसिएशन तर्फे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या शुभहस्ते शाल, सन्मानपत्र, ट्रॉफी व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. सरतेशेवटी सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम करणाऱ्या सर्वांचे व उपस्थितांचे आभार मानून गौतमी जाधव यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

# विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात स्त्री-पुरुष समानतेचा संदेश देणारा तीळगुळ कार्यक्रम उत्साहात पार पडला.

लातूर :- विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात स्त्री-पुरुष समानतेचा संदेश देणारा तीळगुळ कार्यक्रम उत्साहात पार पडला. ३१ जानेवारी रोजी महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना, शाखा लातूर संचलित उत्सव समितीच्या वतीने परिचारीका संवर्गातील महिला व पुरुष कर्मचाऱ्यांसाठी समानतेचा संदेश देणारा तीळगुळ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रुग्णालयाच्या अधिसेविका श्रीमती राजश्री हरंगुळे होत्या तर व्यासपीठावर अतिविशेषोपचार रुग्णालयाच्या मुख्य अधिसेविका श्रीमती अमृता पोहरे, सहाय्यक अधिसेविका श्रीमती लक्ष्मी आपटे, महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना शाखा लातूर संघटनेच्या अध्यक्ष श्रीमती छाया चव्हाण, उपाध्यक्ष श्री संजीव लहाने, उत्सव समितीच्या अध्यक्षा श्रीमती किरण निकम, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना,मुख्यालय लातूर संघटनेचे राज्यखजिनदार श्री राम सुर्यवंशी यांनी केले. यावेळी पाठ्यनिर्देशिका उणिता देशमाने यांची बदली झाल्यामुळे त्यांचा निरोप समारंभ ही पार पडला. तसेच श्री राम सुर्यवंशी यांनी परिचर्या व्यवसायातील सेवांतर्गत पदवी प्रशिक्षण विशेष प्राविण्यासह पुर्ण केले, तसेच श्री अनंत पवार यांनीही सेवांतर्गत पदवी शिक्षण पुर्ण केल्याने त्यांचा सन्मान केला. विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय





व रुग्णालयामध्ये अनेक वर्षांपासून रिक्त असलेली पदे कायमस्वरूपी पदभरतीने भरण्यात येत आहेत. नव्याने रुजू झालेल्या महिला व पुरुष कर्मचाऱ्यांचे या कार्यक्रमा दरम्यान स्वागत करण्यात आले. नव्याने रुजू झालेल्या परिचारीकांना, मुख्य अधिसेविका श्रीमती अमृता पोहरे यांनी मार्गदर्शन केले. तसेच महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना,मुख्यालय लातूर संघटनेच्या राज्य सरचिटणीस यांनी नवनियुक्त परिचारिकांना स्वागतपर मार्गदर्शन करताना, एप्रिल २०२२ मध्ये, शासनाने कंत्राटी पद्धतीने परिचारीकांची पदभरती करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित केला होता. त्यावेळी संघटनेने तात्काळ राज्यस्तरीय बेमुदत आंदोलन केले व त्या आंदोलनाचे फलित म्हणून सद्यस्थितीत ४५०० परिचारीकांची कायमस्वरुपी पदभरती राज्यातील विविध संस्थांमधून होत असल्याची माहिती दिली. पदभरती साठी संघटनेनी हा खुप मोठा लढा उभा केला. त्याला यश ही आले. त्याबद्दल शासनाचे आभार ही व्यक्त केले. परंतु शासनाने परिचारीका संवर्गाच्या वेतनश्रेणी मध्ये झालेला अन्याय, ४० वर्षात न वाढलेले भत्ते,जसे धुलाई भत्ता, गणवेश भत्ता,नर्सिंग भत्ता, शैक्षणिक भत्ते, पदनाम बदल ह्या जिव्हाळ्याच्या व संवेदनशील मागण्यांचा पण गांभीर्याने विचार केला पाहिजे. असे मत मांडले. स्वागत कार्यक्रमा दरम्यान श्री संभाजी मुंडे व श्री केंद्रे यांनी संघटनेनी कायमस्वरूपी पदभरती व परिचारीकांची कंत्राटी भरती रोखण्यासाठी उभं केलेल्या लढ्यामुळे असंख्य परिचारिकांना न्याय मिळाल्याने कृतज्ञता व्यक्त केली व संघटनेचे आभार मानले. अधिसेविका श्रीमती राजश्री हरंगुळे यांनी तीळगुळ प्रमाणे कर्तव्यातही गोड राहून कर्तव्य करु असे सांगितले व अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन रमांजली माने व रुपाली वाघमारे दिघे यांनी केले तर आभार लातूर शाखेचे उपाध्यक्ष श्री संजीव लहाने यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उत्सव समिती अध्यक्ष श्रीमती किरण निकम, श्रीमती मीना दैवज्ञ, श्रीमती ज्योती भारती, श्रीमती वनमाला पांचाळ, शिला कांबळे, निर्मला गाडेकर, मिनाक्षी गोडबोले, सुनिता डावकर, सुनंदा चिलगर, मंगल कदम, गुणा बनसोडे, श्रीमती सुप्रिया कचरे, श्री योगेश वाघ, श्री संजीव लहाने, श्रीमती रेणुका रेड्डी, श्री पांडुरंग गव्हाणे, श्रीमती बालिका सावंत, श्री भगवान केंद्रे, दिपक शिंदे विवेक वागलगावे, आराधना क्षिरसागर, बिस्मिल्ला शेख, धनश्री गोसावी, रुपल बंडगर, शुभम वानखेडे ईत्यादींनी परिश्रम घेतले.

# वंचित बहुजन महिला आघाडीच्या मागाठाणे तालुका अध्यक्ष पदावर शमशाद शेख यांची नियुक्ती

मुंबई / शहामत शेख ;– वंचित बहुजन महिला आघाडीच्या उत्तर मुंबई जिल्यातील मागाठाणे तालुका अध्यक्ष पदावर शमशाद यासीन शेख यांची नियुकी करण्यात आली.पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर यांनि नियुक्तीपत्र दिले. शमशाद शेख या लक्ष्मी नगर कांदिवली पूर्व येथील रहिवाशी आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून विभागात बचत गट व विविध सामाजिक उपक्रम राबवत असतात. महाराष्ट्रात होणाऱ्या आगामी निवडणूक लक्षात घेता वंचित बहूजन आघाडीने पक्ष विस्तार आणि संघटनात्मक बांधणी करण्यास सुरूवात केली आहे ऍड.प्रकाश आंबेडकर आगामी निवडणुक पाहता कार्यकर्त्यांना पूर्ण ताकतीने



कामाला लागण्याची आदेश दिले. याच पार्श्वभूमीवर वंचित बहुजन महिला आघाडी वतीने तालुका,स्तरावर वरील पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर यांच्या सहीनिशी शेख यांस नियुक्ती पत्र देण्यात आले या प्रस्तुत नियुक्ती बद्दल ऍड. अनिल ढवळे,उत्तर मुंबई जील्हा महासचिव, उ. मुंबई जिल्हा उपाध्यक्ष मा.नितीन कांबळे,तसेच वंचित बहुजन युवा आघाडी उत्तर मुंबई जिल्हा सचिव व पत्रकार शहामत शेख व उ. मुंबई जिल्यातील कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी शेख यांना भावी वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या.मागाठाणे विभागातून शेख यांस पुढील वाटचालीस शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

# इमरान खान आणि बुशरा बीबी यांना भ्रष्टाचारप्रकरणी १४ वर्षांची शिक्षा

इस्लामाबाद : पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इमरान खान आणि त्यांची पत्नी बुशरा बीबी यांना न्यायालयाने १४ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे. शिक्षेनंतर बुशरा बीबी यांनी आत्मसमर्पण केले आहे. विरोधी पक्षांनी २०२२ मध्ये इमरान खान यांची पंतप्रधानपदावरून हकालपट्टी केली होती. भ्रष्टाचाराशी संबंधित एका प्रकरणात दोषी आढळल्यानंतर ते आधीच तीन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा भोगत आहे. आज त्यांना भ्रष्टाचाराशी संबंधित एका प्रकरणात १४ वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.या निर्णयानुसार इमरान खान आणि बुशरा बीबी यांना १० वर्षांपर्यंत कोणतेही सरकारी पद धारण करण्यास बंदी घालण्यात आली आहे. याशिवाय इमरान आणि बुशरा यांच्यावर ७८–७८ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. इमरान खान यांनी म्हटले आहे की, त्यांच्यावरील बहुतांश



खटले राजकीय हेतूने प्रेरित आहेत.इमरान खान यांना ही शिक्षा पाकिस्तानमधील सार्वत्रिक निवडणुकीच्या काही आठवडे आधी झाली आहे. इमरान खान यांच्यावर यापूर्वीच निवडणूक लढवण्यास बंदी घालण्यात आली आहे. इमरान खान यांना गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये अटक झाल्यापासून तुरुंगात ठेवण्यात आले आहे. सुनावणीदरम्यान त्यांची पत्नी बुशरा बीबी हिला कोठडीत ठेवण्यात आले होते.

# मोटारसायकल व मोबाईल चोरणाऱ्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने केले अटक. चोरीचे ८ गुन्हे उघड

लातूर :– मोटारसायकल व मोबाईल चोरणाऱ्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने केले अटक. चोरीचे ८ गुन्हे उघड❋ याबाबत थोडक्यात माहिती की, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीमधून मोटार सायकल चोरून नेल्याची घटना घडली होती. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हे दाखल झाला होता. तसेच इतर पोलीस स्टेशनला देखील मोटर सायकल, मोबाईल चोरीचे गुन्हे दाखल होते.

सदरचे गुन्हे उघडकीस आणणे बाबत पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी आदेशित केले होते. त्यावरून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे ,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमलदारांचे पथके तयार करून त्यांना सखोल मार्गदर्शन व सूचना देण्यात आल्या होत्या. सदर पथकाकडून गुन्ह्या संदर्भात बारकाईने तपास सुरू असताना मोठ्या प्रमाणात बातमीदार नेमून तसेच तांत्रिक माहितीचे विश्लेषण करून अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेण्यात येत होते.

वरिष्ठांचे मार्गदर्शनात सदरच्या पथकांनी केलेल्या परिश्रमामुळे पथकांना गुप्त बातमीदाराकडून मोटार सायकल व मोबाईल चोरीचे गुन्हे करणाऱ्या आरोपींची माहिती मिळाली.

सदर माहितीची बारकाईने अभ्यास व विश्लेषण करून मोटर सायकल व मोबाईल चोरी करून ते मोबाईल कमी किमतीत लोकांना विकणाऱ्या आरोपींची टोळी निष्पन्न करून, टोळीतील सदस्यांना त्यांच्या राहते ठिकाणाहून ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर पथकांनी अतिशय कुशलतेने व उत्कृष्टपणे नमूद





गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेऊन खालील आरोपींना चोरी केलेला १ लॅपटॉप, ११ मोटरसायकली व २१ मोबाईलसह ताब्यात घेण्यात आले.
१)अक्षय प्रभाकर कणसे,वय २८ वर्ष, राहणार वाल्मिकी नगर,गल्ली नंबर ३, लातूर.
२) समाधान बाळासाहेब जाधव, वय २० वर्ष, राहणार काडगाव ,तालुका जिल्हा लातूर. सध्या राहणार एस एस लॉजच्या बाजूस, एक नंबर चौक, लातूर.
३) सद्दाम हुसेन शेख,वय २४ वर्ष, राहणार पळसप, तालुका जिल्हा धाराशिव. सध्या राहणार माऊली नगर पाखरसांगवी, लातूर.
४) राम उर्फ लखन सुधाकर संदीले, वय २४ वर्ष राहणार, सरस्वती शाळेच्या पाठीमागे, प्रकाश नगर, लातूर.
५)महेश नामदेव नरहरे, वय २१ वर्ष, राहणार महाळग्रा तालुका चाकूर, जिल्हा लातूर. सध्या राहणार सोना नगर, लातूर.
६) आशिष गोविंद पवार, वय २४ वर्ष, राहणार माळुंब्रा, तालुका औसा जिल्हा लातूर सध्या राहणार सोना नगर, लातूर.

यांना दिनांक ३०/०१/२०२४ रोजी त्यांचे राहते ठिकाणाहून ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्यांनी त्यांच्या आणखीन तीन साथीदारासह लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोबाईल व मोटार सायकल चोरीचे गुन्हे केल्याचे कबुल केले. नमूद आरोपीनी विविध गुन्ह्यात चोरलेला मुद्देमाल १ लॅपटॉप, २१ मोबाईल व ११ मोटारसायकली असा एकूण ८ लाख ३२ हजार ५०० रुपयाचा मुद्देमाल हजर केल्याने वरील आरोपींना नमूद गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे. तसेच फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

सदर कारवाईत पोलीस ठाणे एमआयडीसी, पोलीस ठाणे शिवाजीनगर, पोलीस ठाणे गांधी चौक,पोलीस ठाणे विवेकानंद, पोलीस ठाणे भादा,तसेच पोलीस ठाणे कळंब जिल्हा धाराशिव येथील १ गुन्हा असे एकूण ८ मोटरसायकल व मोबाईल चोरीचे गुन्हे उघड झाले असून चोरीचे आणखीन गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे एमआयडीसी करीत आहेत.

वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस पथकांनी अतिशय उत्कृष्टरित्या तपास करून मोटार सायकल व मोबाईल चोरणाऱ्या आरोपींच्या मुसक्या आवळल्या असून त्यांच्याकडून चोरीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस अमलदार माधव बिल्लापट्टे, नवनाथ हासबे ,रियाज सौदागर, मोहन सुरवसे, राजाभाऊ मस्के, तुराब पठाण, जमीर शेख, राहुल सोनकांबळे, मनोज खोसे, राहुल कांबळे, नितीन कठारे, संतोष खांडेकर,नकुल पाटील यांनी केली आहे.

# परमबीर सिंग यांच्याविरोधातील तपास बंद करण्याचा सीबीआयचा अहवाल

मुंबई : खंडणी मागितल्याप्रकरणी ठाण्यातील कोपरी पोलिस ठाण्यात माजी पोलिस आयुक्त परमबीर सिंग यांच्यासह इतरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास बंद करण्याचा अहवाल केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (सीबीआय) मुख्य न्याय दंडाधिका–यांकडे सादर केला आहे.परमबीर सिंह यांनी राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर गंभीर आरोप केले होते. त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र लिहून महाविकास आघाडीमध्ये खळबळ माजवून दिली होती. वेगवेगळ्या महत्त्वाच्या हॉटेल आणि बारमधून वसुली गोळा करायला लावली जाते, खंडणी गोळा करायला



लावली जाते, असे आरोप परमबीर सिंह यांनी केले होते.त्यानंतर परमबीर सिंह आणि इतरांविरुद्ध खंडणी वसूल केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झालेला होता. गुन्हा घडल्यानंतर पाच वर्षांनंतर तक्रार करण्यात आली असून हे आरोप सिद्ध करणारे पुरावे आढळलेले नाहीत, असे सीबीआयने अहवालात म्हटले आहे.२०१६–१७ मध्ये घडलेला हा गुन्हा सिद्ध करण्यासाठी आवश्यक ते पुरावे उपलब्ध झालेले नाहीत वा आक्षेपार्ह काहीही आढळलेले नसल्याने सीबीआयने ठाण्याच्या मुख्य न्यायदंडाधिका–यांकडे अहवाल सादर करून तपास बंद करण्याची परवानगी मागितली आहे. परमबीर सिंग यांच्या व्यतिरिक्त उपायुक्त पराग मणेरे, संजय पुनमिया, सुनील जैन, मनोज घोटकर यांच्याविरुद्ध कोपरी पोलिस ठाण्यात धमकावणे आणि खंडणीप्रकरणी जुलै २०२१ मध्ये गुन्हा दाखल झाला होता. आता सीबीआयने पुराव्यांअभावी तपास बंद करण्यासाठी अहवाल सादर केला आहे.

# तरुणींनी अस्तित्व आणि अस्मितेचा लढा जिंकण्यासाठी आत्मनिर्भर व्हावे.

अमर हबीब लातूर :– नवयुगातील तरुणींनी आपल्या अस्तित्वाचा आणि अस्मितेचा लढा जिंकण्याकरिता आत्मनिर्भर व्हायला हवे असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अमर हबीब यांनी केले. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील खट–उ, युवती मंच, महिला तक्रार निवारण समिती आणि आंतरभारती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवती शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचारपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, आंतरभारती (लातूर) अध्यक्ष डॉ. बी. आर. पाटील, सचिव दीपरत्न निलंगेकर, नारी प्रबोधन मंचच्या अध्यक्षा सुमती जगताप, सामाजिक कार्यकर्ते सुपर्ण जगताप, सौ. अरुणा दिवेगावकर, डॉ. पन्हाळे मॅडम, युवती मंच अध्यक्ष प्रा. वनिता पाटील आणि डॉ. शीतल येरुळे आदी मान्यवर उपस्थित होते.





कार्यक्रमाच्या प्रारंभ महाविद्यालयातील संगीत विभागाच्यावतीने साने गुरुजींच्या खरा तो एकची धर्म या गीताने झाला. पुढे बोलताना अमर हबीब म्हणाले की, निसर्गतः महिला कोमल आणि कमजोर वाटत असल्या तरी नवनिर्माणाची क्षमता त्यांच्या अंगी असते त्यामुळे त्या जगात सर्व शक्तिमान अशा असतात स्त्रिया नेहमी अष्टाध्यायी, अष्टावधानी आणि अष्टभुजा असतात. एकाच वेळेला अनेक काम त्या सर्वोतोपरी करू शकतात. प्रथा, परंपरा, रुढी, अंधश्रद्धा, रितीरिवाज, संस्कृती या नावाखाली भारतीय परंपरेत स्त्रियांना गौण लेखण्यात आले आहे असेही ते म्हणाले

कार्यशाळेचे औचित्य साधून स्त्री सबलीकरण, स्त्रिया आणि अंधश्रद्धा, स्त्री–पुरुष समानता, कायदेविषयक जाणीव या विविध विषयावर सत्रनिहाय अरुणा दिवेगावकर, सुमती जगताप आणि सुपर्ण जगताप यांची अभ्यासपूर्ण भाषणे झाली.

या कार्यक्रमाचे स्वागतपर मनोगत उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. वनिता पाटील यांनी केले. अध्यक्षिय समारोप प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गीता शर्मा यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. अलका चिकुर्डेकर यांनी मानले. या युवती कार्यशाळेत महाविद्यालयातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूकनायक पाक्षिक वृत्तपत्राचा कार्यक्रम घेण्यात आला.

वसमत:: संबोधी बुद्ध विहार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मूकनायक पाक्षिक वृत्तपत्राचा कार्यक्रम घेण्यात आला.सर्वप्रथम तथागत गौतम बुद्ध परपुज्य भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी यादव चौरे सर हे होते प्रमुख व्यक्ते रघुपती सरोदे साहेब यांनी आपले मनोगत व्यक्त केले .तसेच मेजर सूर्यतळ साहेब, बार्टी समतादूत मिलिंद आळणे सर यांनी मनोगत व्यक्त केले डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांनी १०४ वर्षांपूर्वी केलेल मूकनायक पाक्षिक मराठी पत्रकारितेल ऐतिहासिक परंपरेची स्थापना करणारी घटना ठरली.मूकनायकचा पहिला अंक ३१ जानेवारी १९२० रोजी मुंबई त प्रकाशित करण्यात आला. आपल्या चळवळीची भूमिका आणि आपल्या समाजाचे प्रश्न मांडण्यासाठी वृत्तपत्राची गरज असल्याचे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या लक्षात आले होते त्या भूमिकेतूनच डॉक्बाबासाहेब आंबेडकर यांनी मूकनायक पक्षकाची सुरुवात केली. मूकनायकाची स्थापना करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यापुढे





आर्थिक प्रश्न निर्माण झाला होता मात्र राजश्री शाहू महाराज यांनी अडीच हजार रुपयाची मदत केली होती मूकनायकाच ब्रीद वाक्य म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी संत तुकाराम महाराजांच्या अभंगाची निवड केली होती काय करू आता धरूनिया भीड निशंक हे तोंड वाजविले नवे जगी कोणी मुक्ती यांची जाण सार्थक लावून नवे इतर या संत तुकाराम महाराजांच्या अभंगाची निवड ब्रीदवाक्य म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी मूकनायक सुरू करण्यामागील वैचारिक भूमिका वृत्तपत्रासारखा समकालीन सामर्थ्यशाली माध्यम हातात असल्याशिवाय अस्पृश्य समाजाच्या दुःखांना दूर केलं जाऊ शकत नाही याचा विचार करून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी मूकनायकाची सुरुवात केली होती सूत्रसंचालन नंद साहेब यांनी केले याप्रसंगी डॉ .मुळे साहेब ,शेळके सर, पंडित सर, रघुपती सरोदे साहेब, धांडे सर, कसबे साहेब, कांबळे साहेब, भारशंकर सर, सूर्यतळ साहेब, नामदेव इंगोले, सर ,पी डब्ल्यू कांबळे सर ,आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# राजेश्वर कांबळे यांना राज्यस्तरीय दर्पण पत्रकारिता पुरस्कार जाहीर

कंधार :– उज्वल प्रतिष्ठान, कंधारतर्फे देण्यात येणारा राज्यस्तरीय दर्पण पत्रकारिता पुरस्कार यंदा कंधारचे प्रख्यात पत्रकार राजेश्वर कांबळे यांना जाहीर झाला आहे. मानचिन्ह, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, पदक, ग्रंथ, मानाचा फेटा, पुष्पहार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. लवकरच एका समारंभात हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येणार आहे.

राजेश्वर कांबळे हे प्रतिभावंत पत्रकार म्हणून ओळखले जातात. मागील वीस वर्षांपासून पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. आजवर त्यांनी विविध क्षेत्रावर विपुल लेखन केले आहे. आपल्या लेखणीच्या माध्यमातून सकारात्मक, निर्भीड, निष्पक्ष, भेदक, सर्वसमावेशक, विश्लेषणात्मक पत्रकारिता करत कंधारकरांचा आवाज बनले आहेत. सर्वसामान्यांच्या न्याय–हक्कांसाठी लढा देत आहेत. पत्रकारिता क्षेत्रात त्यांचे भरीव योगदान आहे. सामाजिक क्षेत्रातही मोलाची भूमिका आहे. कंधार नगरपालिकेचे ते ब्रँड ॲम्बेसेडर होते. त्यांनी विविध संघटनेचे महत्वपूर्ण पदे भूषविले आहेत. जवळपास बारा लेख त्यांच्यावर प्रकाशित झालेले आहेत. आजवर नेहरू आंतरराष्ट्रीय सामजिक पुरस्कार, राज्यस्तरीय पत्रकारत्न पुरस्कार, कोविड योद्धा पुरस्कार, पत्रकारिता सन्मान पुरस्कार, जीवनगौरव पुरस्कार, राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार, मराठवाडास्तरीय शोधवार्ता पत्रकारिता पुरस्कार अशा विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

उज्वल प्रतिष्ठान, कंधारतर्फे विविध क्षेत्रात



उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना दरवर्षी विविध पुरस्कारांने सन्मानित करण्यात येते. या पुरस्कारांचे हे दुसरे वर्ष आहे. या वर्षीचे पुरस्कार्थी निवडण्यासाठी निवड समिती गठीत करण्यात आली होती. सदर निवड समितीने पुरस्कार विजेत्यांच्या नावांची घोषणा केली. सन २०२३ या वर्षीचा राज्यस्तरीय दर्पण पत्रकारिता पुरस्कार कंधारचे प्रख्यात पत्रकार राजेश्वर कांबळे यांना जाहीर करण्यात आला आहे. मानचिन्ह, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, पदक, ग्रंथ, मानाचा फेटा, पुष्पहार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी त्यांना पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE